

# शेतकरी गट
## कृषी विकासाची गुरुकिल्ली

◉ डॉ. अनघा पाटील ◉



### शेतकरी गट : कृषी विकासाची गुरुकिल्ली



प्रा. डॉ.अनघा पाटील

दिलासा जनविकास प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून ग्रामविकास आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात गेली वीस वर्षे सातत्यपूर्ण कार्य करणाऱ्या डॉ. अनघा पाटील यांचे 'शेतकरी गट : कृषी विकासाची गुरुकिल्ली' हे पुस्तक प्रकाशित होत आहे. औरंगाबादच्या विवेकानंद कला आणि सरदार दलिपसिंग वाणिज्य महाविद्यालयात मानसशास्त्राच्या विभाग प्रमुख असलेल्या डॉ. पाटील यांनी यापूर्वीही विविध विषयांवर लेखन केले आहे. शेतकऱ्यांच्या भक्कम संघटनावर आधारित गटांची उभारणी त्यांची बाजारपेठेशी जोडणी आणि त्याद्वारे साधला जाणारा शेतकऱ्यांचा आणि पर्यायाने शेतीचा विकास ही या लेखनामागची भूमिका आहे.

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत सध्या जागतिक बँकेच्या सहकार्याने आणि आत्मा संस्थेच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर राज्यभर शेतकरी गटांच्या स्थापनेचे काम चालू आहे. अनेक राज्यांत शेतकरी गटांनी कंपन्या स्थापन करून आर्थिक विकासाचा नवा आदर्शही उभा केला. त्या कंपन्यांना उत्कृष्ट यशही मिळाले. हे लक्षात घेऊन भविष्यात स्थापन होणाऱ्या शेतकरी गटांनाही गट स्थापनेची प्रक्रिया, त्याचे मजबुतीकरण, कार्यपद्धती लक्षात यावी, त्यांना

DILASA

सेंटर फॉर सस्टेनेबल लाइव्हलीहुड

बी-३, सुदर्शन पार्क, एमआयडीसी विभागीय कार्यालयासमोर, वेदांतनगर, औरंगाबाद-४३१००५
☎(०२४०) २३२०४४४, २३६३७४१, फॅक्स (०२४०) २३६३७४१, ईमेल : dilasango@gmail.com



# शेतकरी गट
## कृषी विकासाची गुरूकिल्ली

• डॉ. अनघा पाटील •


**सेंटर फॉर सस्टेनेबल लाइव्हलीहुड**

*(an initiative by Dilasa Janvikas Pratishthan)*

बी-३, सुदर्शन पार्क, एमआयडीसी विभागीय कार्यालयासमोर, वेदांतनगर, औरंगाबाद-४३१ ००५

☎(०२४०) २३२०४४४, २३६३७४१, फॅक्स (०२४०) २३६३७४१, ईमेल : dilasango@gmail.com.





शेतकरी गट

कृषी विकासाची गुरूकिल्ली



■ **लेखक**

**डॉ. अनघा पाटील**

■ **मुखपृष्ठ व संगणकीय जुळणी**

**रवि बोराडे**

दिलासा जनविकास प्रतिष्ठान,

औरंगाबाद

■ **मुद्रक व प्रकाशक**

**सेंटर फॉर सस्टेनेबल लाइव्हलीहुड**

बी-३, सुदर्शन पार्क, वेदांतनगर,

औरंगाबाद-४३१००५.

दूरध्वनी : (०२४०) २३२०४४४, २३६३७४१

ईमेल : dilasango@gmail.com

वेबसाईट : www.dilasango.org

■ **प्रकाशन दिनांक**

जुलै २०१४

■ **मूल्य रु. २५**



© सेंटर फॉर सस्टेनेबल लाइव्हलीहुड



(Dilasa)F:Publication\MACP-Agri\MACP-Farmer Group-booklet.cdr

## प्रस्तावना


कृ.वि. देशमुख

गेल्या दशकात बचत गटांवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते, त्यास राज्यात भरपूर प्रतिसाद मिळून अनेक बचत गट तयार झाले व स्वयंपूर्णही झाले आहेत. चालू दशकामध्ये शेतकरी गटांवर विशेष भर दिला जात आहे.

केंद्र व राज्य शासनामार्फत कृषी क्षेत्राच्या विकासासाठी / सबलीकरणासाठी विविध योजना राबविण्यात आल्या आहेत. त्यामुळे कृषी आणि संलग्न क्षेत्रातील तंत्रज्ञानात चांगले बदल होताना दिसत आहेत. या बदलाबरोबरच शेतीसाठी मजूर समस्या शेतकऱ्यास भेडसावत आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवावयाचे असेल तर राज्यातील लहान व सीमांत शेतकऱ्यांच्या गटांची बांधणी करणे गरजेचे आहे. अल्प व अत्यल्प शेतकऱ्यांना त्यांच्या छोट्या शेतीच्या आकारावर व त्यातील उत्पादनाच्या विक्रीवर असलेली बंधने दूर करून, त्यांच्या सामूहिक प्रयत्नांच्या जोरावर निविष्ठा, साधने, कृषी तंत्रज्ञानाचा वापर व उत्पादित मालाची एकत्रित विक्री या संदर्भातील अडचणींवरील प्रभावी उपाय म्हणून शेतकऱ्यांच्या मालकीच्या नोंदणीकृत उत्पादक कंपन्या निर्णायक भूमिका बजावू शकतात; हे आता लक्षात येऊ लागले आहे.

शेतकरी उत्पादक संघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांची व्यवहारशक्ती वाढविणे, जेणेकरून त्यांना निविष्ठा व तंत्रज्ञानाची उपलब्धता, बाजारभाव निश्चित करणे, खाजगी कंपनीबरोबर करार करणे, मूल्यवर्धित बाजारात सहभागी होणे यासारखे इतर अनेक फायदे करून घेता येतील, की जे एका वैयक्तिक शेतकऱ्यास सहज उपलब्ध होणे कठीण आहे. अत्यंत कमी जमीन धारणक्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांना शेतकरी उत्पादक संघाच्या माध्यमाने गटाचे फायदे व व्यक्तिगत मालकीद्वारे गरजेनुरूप निविष्ठा खरेदी व ग्राहकाच्या पसंतीनुसार पणनव्यवहार इत्यादींचे फायदे घेता येतील. शेतकरी मजूर समस्या, पीक उत्पादकता वाढआणि आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी लहान व सीमांत शेतकऱ्यांचे गट स्थापन करून छोट्या शेतकऱ्यांचा कृषी व्यापार संघ पर्यायाने शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करणे ही आजची गरज आहे.

डॉ. अनघा पाटील यांनी गेल्या दशकातील स्वानुभवातून गट निर्मितीचे केलेले काम हे पुस्तक निर्मितीस पूरक ठरले आहे. या पुस्तकातील तत्त्वांचा अंगीकार केल्यास भविष्यात शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्या निश्चितपणे शाश्वत व्यवस्थेवर पुढे आलेल्या पाहावयास मिळतील. त्यांच्या प्रयत्नांना सुयश चिंतितो.

**कृ.वि. देशमुख**
संचालक
कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था (आत्मा)
तथा व्यवस्थापकीय संचालक
म.रा. छोट्या शेतकऱ्यांचा कृषी व्यापार संघ, पुणे

# अनुक्रमणिका

१) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाची ओळख ............ १
२) आत्मा आणि महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प ......... ४
३) उत्पादक शेतकरी गटाची स्थापना.......................... ५
४) शेतकरी उत्पादक गटाचे कामकाज ......................... १७
५) शेतकरी गटाचे रेकॉर्ड................................. २०
६) शेतकरी उत्पादक संघ / कंपनीची स्थापना..................... २२
७) नेहमी विचारले जाणारे प्रश्न............................ २५
८) शेतकरी उत्पादक संघासाठी उपयुक्त अर्थसाहाय्य योजना..... २७
९) यश कथा : उत्पादक शेतकरी कंपन्यांच्या .................. ३१



# १ महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाची ओळख

भारत हा कृषिप्रधान देश असल्याने ५७.८% जनता शेतीवरच गुजराण करीत आहे. गेल्या काही वर्षात शेती करण्याची पध्दत, खते, बियाणे, तंत्रज्ञान, बाजारपेठ यात कितीतरी बदल झाले तरीही अद्याप शेती विषयक समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न पूर्णतः सुटलेले नाहीत. नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशनने शेतकऱ्यांचा सविस्तर अभ्यास केला त्यात असे दिसून आले की, ४०% शेतकरी शेती व्यवसायातून मुक्त होऊ इच्छितात.

एकीकडे भांडवलदार व्यक्ती शेती उद्योगांकडे वळत आहेत तर दुसरीकडे शेतकरी मात्र हताश आहेत असे चित्र दिसते. विशेषतः कोरडवाहू शेतीत पुरेसा खर्च लावून देखील शेतकऱ्याच्या दैनंदिन गरजा पूर्ण होणे अवघड होत आहे. उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होत असल्याने दिवसेंदिवस शेती परवडेनाशी झाली आहे. पीक जोमदार आले तरी योग्य भाव मिळेल याचा शेतकऱ्याला भरवसा राहिलेला नाही. बाजारपेठेत जीवघेणी स्पर्धा वाढत आहे. तसेच प्रयोग शाळेतील संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचलेले नाही.

गेल्या काही वर्षात पाऊसमान ही लहरी होत चालले आहे. शेतीचे क्षेत्रच अनेक कारंणामुळे कमी होत आहे. शेती विकास करताना अजूनही पारंपरिक आणि एकांगी पध्दतीचा विचार होत आहे. त्यामुळे शेतीच्या उत्पादनात म्हणावी तितकी वाढ झालेली नाही; त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारली नाही. शेतकऱ्याचे दैन्य संपले नाही. दिवसेंदिवस खते, बियाणे, इंधन, मजूर यांचे भाव वाढत चाललेले आहेत. पिकांवरील रोगराई, मजुरांचा तुटवडा, नगदी पीक घेण्यासाठी वाढलेला उत्पादन खर्च, बाजार भावाबाबत अनिश्चितता या समस्या शेतकऱ्याला त्रस्त करीत आहेत. याचा परिणाम म्हणून पीक उत्पादन वाढीसाठी केलेले प्रयत्न बरेचसे अयशस्वी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शेती व्यवस्थेला वेगळे वळण देणे आवश्यक होते. त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प राबविला जात आहे.



जागतिक बँकेच्या अर्थ साहाय्याने हा प्रकल्प महाराष्ट्रात सहा वर्षात टप्प्याटप्प्याने पूर्ण केला जाणार आहे. एकूण हा प्रकल्प ७०३ कोटी रुपयांचा आहे त्यात जागतिक बँक कर्ज रुपात ४६१ कोटी रुपये देणार आहे. शासनाचा वाटा ५१ कोटी असून लाभार्थी संस्थेचा हिस्सा १९१ कोटी आहे. या प्रकल्पात पहिल्या टप्प्यात १० जिल्हे आणि दुसऱ्या टप्प्यात ११ जिल्हे तर तिसऱ्या टप्प्यात १२ जिल्हे आहेत. एकूण सहा वर्ष म्हणजे २०११ ते २०१६ पर्यंत प्रकल्प राबविला जाणार आहे. या प्रकल्पात शेती विकासाशी संबंधित समस्या सोडविण्यावर भर आहे. या समस्या सोडविण्यासाठी शेतकरी समर्थ, सक्षम असला पाहिजे. त्याच्या ठिकाणी बाजार पेठेतील स्पर्धेला तोंड देण्याची ताकद निर्माण व्हायला हवी आहे. थोडक्यात बाजारपेठेतील आव्हाने लक्षात घेऊन शेतकऱ्याला स्पर्धाक्षम बनविण्याचा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

## उद्दिष्टे

१) सध्या चालू असलेल्या कृषी विस्तार सेवांमध्ये सुधारणा करणे.
२) शेतकऱ्यांना संघटित करण्यासाठी शेतकरी गट स्थापन करणे.
३) शेतकरी गटातील सदस्यांना प्रशिक्षण देऊन क्षमताबांधणी करणे.
४) विविध प्रकारचे तंत्रज्ञान, माहिती शेतकऱ्यांपर्यन्त पोहचवणे, शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ करणे.
५) शेतीची उत्पादकता, उत्पादनांची गुणवत्ता आणि रोजगाराच्या संधी वाढविणे.
६) शेतकऱ्यांना बाजारपेठेत मालाच्या विक्रीसाठी चांगल्या संधी निर्माण करुन देणे.
७) शहरातील ग्राहक डोळयासमोर ठेवून दर्जेदार शेतमालाचे उत्पादन करणे आणि शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविणे.
८) बाजार व्यवस्था सुधारणे आणि शेतकऱ्यांना मालाच्या विक्रीची संधी देणे.
९) शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्या स्थापन करून त्यांचा आर्थिक विकास करणे.



## प्रकल्पाची अंमलबजावणी

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाची अंमलबजावणी शासनाच्या कृषी विभाग, पणन विभाग व पशुसंवर्धन विभाग या तीन विभागांकडून होणार आहे.

**कृषी विभाग :** कृषी विभागाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. या विभागामार्फत केवळ कृषी विस्तारावर भर दिला जाणार नाही तर बाजारपेठेतील मागणीचा विचार करुन शेतमाल उत्पादनावर भर दिला जाणार आहे. त्यामध्ये धान्य, फळे, भाजीपाला इ. उत्पादने आहेत. बाजारपेठेतील वाढती स्पर्धा लक्षात घेऊन त्यानुसार नवीन तंत्रज्ञान, कौशल्ये, शेतीपूरक व्यवसाय आणि त्याच्याशी संबंधित प्रात्यक्षिके व प्रशिक्षण कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी आयोजित केले जाणार आहेत. तसेच अभ्याससहली, खरेदीदार आणि विक्रेते यांचे मेळावे, नावीन्यपूर्ण प्रयोग, पीक प्रात्यक्षिके इत्यादींचा समावेश आहे.

**पणन विभाग :** या प्रकल्पात आठवडी बाजारांमध्ये सुधारणा करुन तेथील खरेदी विक्री व्यवस्था बळकट करण्यात येणार आहे. सध्या आठवडी बाजारांची स्थिती अत्यंत बकाल आहे. बाजारामध्ये चांगल्या सोयीसुविधा निर्माण करुन विक्रेते व ग्राहक या दोघांनाही फायदा मिळेल अशी व्यवस्था निर्माण करण्यावर भर आहे. तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कामकाजातही पारदर्शकता आणण्यात येईल. त्यासाठी बाजार समित्यात दाखल होणाऱ्या मालाची अद्ययावत नोंद करणे, हिशोब पध्दतीमध्ये सुधारणा आणणे इ. उपाय अवलंबले जाणार आहेत. या प्रकल्पातून १०० बाजार समित्यांचा विकास केला जाणार आहे.

जनावरांचे बाजार सध्या अत्यंत दुर्लक्षित आहेत. जनावरांच्या बाजारामध्येही आधुनिक सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. उदा.स्वच्छतागृहे, रस्ते, पिण्याचे पाणी, जनावरे उतरविण्यासाठी रॅम्प या सुधारणा करून जनावरांना योग्य किंमत मिळावी म्हणून प्रयत्न केले जातील. या प्रकल्पात २० जनावरांचे आणि ४ शेळयामेढयांचे बाजार विकसित केले जाणार आहेत.

**पशुसंवर्धन विभाग :** पशुसंवर्धन विभागामार्फत पशुपालनाविषयीची नवीन माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिली जाणार आहे. विशेषतः बाजारभाव काय आहेत, व्यापारी उलाढाल किती? इ. बदद्लची अधिकृत माहिती मिळत नाही. त्यासाठी विभागा मार्फत आधुनिक यंत्रणा उभी केली जाणार आहे. त्यामध्ये पशुधन व पशुजन्य पदार्थांचे बाजारभाव, निर्यात, उद्योजक इ. बाबतची माहिती दिली जाईल. थोडक्यात पशुसंवर्धन हा शेतीला जोडधंदा म्हणून फायदेशीर ठरवा यासाठी यंत्रणेमार्फत प्रयत्न केले जाणार आहेत.





# २ आत्मा आणि महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प

शेतकऱ्यांच्या विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या या प्रकल्पात कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा म्हणजेच आत्मा यंत्रणेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आत्माच्या माध्यमातून यापूर्वी शेतकऱ्यांसाठी विविध प्रकल्प उत्कृष्टपणे राबविण्यात आले आहेत. हे प्रकल्प यशस्वी झाल्याने केंद्र शासनाच्या पुढाकाराने जिल्हा स्तरावर आत्मा संस्थेची स्थापना केली गेली. कृषी विस्तार सेवांमध्ये सुधारणा करणे, विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, शेतकऱ्यांच्या क्षमता वाढवणे, त्यांना नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, इत्यादी महत्त्वाची कामे आत्मा संस्था करते.

या प्रकल्पातही आत्मा संस्थेच्या सहकार्याने कृषी विस्ताराचे काम सक्षमपणे केले जाणार आहे. बाजारपेठेची गरज लक्षात घेऊन कृषी विस्तार करण्यावर आत्मा संस्थेचा भर राहणार आहे. या कामासाठी शासनाने स्तवंत्र कर्मचारी वर्ग नेमला आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

प्रकल्प संचालक
↓
उपसंचालक
↓
तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक
↓
साहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक
↓
शेतकरी मित्र

या प्रकल्पात गट बांधणीसाठी स्वतंत्र संस्थांची नेमणूक करण्यात आली आहे. संस्था आणि आत्मा यांच्या सहकार्यातून गट स्थापनेची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. संस्थेद्वारे शेतकऱ्यांच्या गट बांधणीचे काम पूर्ण झाल्यावर तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापकाकडून गटाचे रजिस्ट्रेशन करावयाचे आहे. तसेच त्यांच्याकडून रजिस्ट्रेशनचे पत्र घेऊन बँकेत शेतकरी गटाचे खाते उघडायचे आहे. आत्मामार्फत पीक प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, अभ्यास दौरे (राज्यात आणि बाहेरही) याचा लाभ शेतकरी गटांना मिळेल. एकंदरीत या संपूर्ण प्रकल्पाची अंमलबजावणी सहकार व पणन, कृषी आणि पशुसंवर्धन विभाग या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.



## ३ उत्पादक शेतकरी गटाची स्थापना

आजच्या परिस्थितीचा विचार केला तर शेतकरी अत्यंत अडचणीत आहे. त्याच्या मालाला हमीभाव नाही बाजारपेठेचा भरवसा नाही आणि त्यात दलालांचा सुळसुळाट आहे त्यामुळे मिळेल त्या किमंतीत माल विकण्याशिवाय शेतकऱ्याला पर्याय नाही. एकीकडे तंत्रज्ञान दिवसेंदिवस प्रगत होत आहे. हे तंत्रज्ञान सहजासहजी स्वीकारण्याची, कौशल्य आत्मसात करण्याची, शेतकऱ्याची तयारी नाही. या सगळयांचा परिणाम उत्पादनाच्या गुणवत्तेवर होऊन भरडला जातो तो शेतकरी. कधी पीक चांगले आले तर



त्याची साठवण, देखभाल व विक्री यासाठी योग्य सुविधा नाहीत. यासर्वातून बाहेर पडण्यासाठी मार्ग काय? यासाठी शेतकरी संघटित हवा. एकजुटीच्या बळावर शेतकरी अनेक गोष्टी करु शकतो. यासाठी शेतकरी गट स्थापन करणे अत्यंत महत्वाचे आहे. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पात नगदी पिकावर आधारित शेतकऱ्यांचे गट बांधले जात नाहीत. उदा. कापूस, ऊस यासारख्या पिकांशी संबंधित गट यात समाविष्ट नाहीत.



**"एकाच वस्तीतील एकाच शेतमालाचे उत्पादन घेणाऱ्या साधारणपणे सारखी आर्थिक, सामाजिक परिस्थिती असलेल्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या गटाला शेतकरी गट असे म्हणतात".**

शेतकऱ्यांसमोरच्या अडचणी आपण यापूर्वीच पाहिल्या. तोटयात चाललेल्या शेतीला सावरण्यासाठी जोडधंदा, रोजगार, शोधल्याशिवाय इलाज नाही. या सगळयाच गोष्टी करणे एकटया शेतकऱ्याला शक्य नाही. शेतकऱ्यांच्या अडचणी काही प्रमाणात सुटण्यासाठी शेतकऱ्यांनी एकत्रित येणे, एकजूट करणे, शेतकरी गट स्थापन करणे, ही शेतकऱ्यांच्या विकासाची गुरुकिल्ली आहे. गावातले शेतकरी एकत्र आले तर बऱ्याच प्रमाणात शेतीवरील खर्चात बचत होऊ शकते. खते, बी-बियाणे, कीटकनाशके यांची खरेदी एकत्रितपणे करता येते. तसेच शेतमालाची लावणी, काढणी, विक्री, देखभाल, साठवणूक या गोष्टीसाठी सुध्दा एकत्र येणे खूप गरजेचे आहे. शेतीमालावर प्रक्रिया करून शेतकरी आपल्या उत्पन्नात भर टाकू शकतात. या सर्व गोष्टी एकट्याने करताना शेतकऱ्याची दमछाक होतेच. शिवाय त्याचा खर्चही वाढतो. गटामुळे शेतकऱ्याला आधार मिळतो. दरमहा केली जाणारी बचत बँकेत सुरक्षित रहाते. त्याला व्याज मिळते. ही बचत म्हणजे भविष्यात शेतकऱ्याला जी उत्पादक कंपनी स्थापन करायची आहे, त्याच्या भागभांडवलाची तयारीच आहे. एका अर्थाने शेतकरी गट हे वरदानच आहे.

### गटाचे महत्त्व

शेतकरीगट या शब्दातच त्याचे महत्व दडलेले आहे.

- शे → शेतकऱ्यांचा विकास करणारा.
- त → तज्ज्ञांमार्फत सुयोग्य तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणारा.
- क → कर्तृत्वाला बळ देणारा / कसब वाढविणारा.
- री → रीतसरपणे कार्य करणारा.
- ग → गरजा पूर्ण करणारा.
- ट → टप्प्याटप्प्याने शेतकऱ्याची सुधारणा करणारा.

वर दिलेल्या वैशिष्ट्यांपेक्षा शेतकरी खूप काही करु शकतात. जाणीव जागृतीचे कार्यक्रम घेणे, अभ्यास सहली काढणे, विशिष्ट तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेणे. तज्ज्ञांची भाषणे आयोजित करणे इ.

पिकांवर आधारित शेतकरी गट तयार झाल्यास शेतकऱ्याची बाजारपेठेत पत वाढणार आहे. त्याने उत्पादित केलेला माल हा कोणत्या भावाने विकायचा हे ठरविण्याचे बळ त्याला मिळणार आहे. तसेच ग्राहकांपर्यंत त्याला थेट पोहचता येणार आहे. यासाठी शेतकरी गट मजबूत हवा.

## गटस्थापनेचे नियम :

शेतकरी गटाचे काम व्यवस्थित पार पाडण्यासाठी काही नियम पाळणे आवश्यक आहे. हे नियम गटातील सर्व सभासद मिळून ठरवितात. उदा. महिन्याला किती बचत करावी, बैठकीची तारीख कोणती असावी, गटाची बचत कोणी जमा करायची, इत्यादी. सर्वसाधारणपणे शेतकरी गट स्थापनेसाठी नियम खालीलप्रमाणे -

१) शेतकरी गटामध्ये १५ ते २० सभासद असावेत.
२) गटातीलसभासद समान पिकांचे उत्पादन घेणारे असावेत.
३) गटातीलसभासद शेतकऱ्याकडे किमान १ हेक्टर जमीन असावी.
४) जमीन सभासदाच्या नावावर असणे आवश्यक आहे, नसल्यास ज्याच्या नावावर कुटुंबात जमीन आहे त्याचा ७/१२ घ्यावा आणि सभासदाला गटात सहभागी होण्यासाठी जमीन मालकाचे संमती पत्र घ्यावे.
५) बँकेमध्ये गटाच्या नावाने संयुक्त खाते उघडणे आवश्यक आहे.
६) दर महिन्याला सर्व सभासदांनी सारखीच बचत करावी.
७) गट स्थापन झाल्यानंतर त्याची आत्माकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.
८) गटात सहभागी शेतकऱ्यांनी ७/१२ उतारे जमा करावेत.
९) एका कुटुंबातून एकाच व्यक्तीस गटात सहभागी होता येईल.

## शेतकरी गट कसा स्थापन करावा?

१) पिकानुसार २० ते २२ शेतकऱ्यांनी एकत्र यावे. उदा सोयाबीन पीक घेणारे शेतकरी. ज्वारी, बाजरी पिकांचे उत्पादन करणारे शेतकरी. थोडक्यात या प्रकल्पात शेतकरी गट पिकांवर आधारित असतात.





२) गट स्थापनेसाठी गावातील शेतकऱ्यांची बैठक घ्यावी.
३) गटाला नाव देऊन अध्यक्ष, सचिव ठरवावेत.
४) बँकेत खाते उघडण्यासाठी गटाचे ठराव घ्यावेत.
५) गटाची कागदपत्रे तयार झाल्यावर ती तालुका कृषी कार्यालयात सादर करावीत आणि गटाचे रजिस्ट्रेशन करून घ्यावे.
६) रजिस्ट्रेशनसाठी लागणारा निधी गटातील सभासदांनी द्यावयाचा आहे.
७) कृषी कार्यालयाचे बँकेत खाते उघडण्यासाठी पत्र घ्यावे.
८) गट रजिस्टर झाल्याचे प्रमाणपत्रही कृषी कार्यालयाकडून घ्यावे.

## गटाचे खाते उघडणे

१) शेतकरी गटाचे नांव, अध्यक्ष आणि सचिव ठरल्यानंतर तसा लेखी ठराव करावा. आणि त्याची प्रत बँकेसाठी तयार करावी तसेच खाते उघडण्यासाठी बँकेला अर्ज द्यावा.
२) गटाचा शिक्का तयार करावा.
३) बचतीची रक्कम सर्व सदस्यांकडून जमवावी.
४) सोबत अध्यक्ष, सचिवांचे दोन, दोन फोटो, मतदान कार्ड किंवा आधारकार्ड याची झेरॉक्स जोडावी. (प्रत्येक बँकेचे नियम वेगवेगळे असतात. त्यामुळे बँकेच्या नियमानुसार कागदपत्रे तयार करावीत. )
५) गटाची माहिती सोबत जोडावी.
६) अध्यक्ष, सचिवांच्या सहीने गटाच्या नावे संयुक्त खाते उघडावे.

शेतकरी गटाचे खाते उघडण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचे नमुने सोबत छापले आहेत. त्यानुसार कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.



# आत्मा आणि दिलासा जनविकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाअंतर्गत शेतकरी पीक व पशुसंवर्धन गट स्थापना

DILASA

शेतकरी गटाचे नाव : दिलासा...............................................................

## प्रपत्र-४

पत्ता : ...............................

तालुका : .......... जिल्हा :..........

दिनांक : ..../..../..........

प्रति,
मा. शाखा व्यवस्थापक,
.........................................
शाखा ...................................
ता. ................ जि. ................

**विषय : .............................................. शेतकरी गटाचे खाते उघडण्याबाबत.**

महोदय,

आम्ही सर्वजण ................................................ येथील रहिवासी असून आम्ही सर्वांनी मिळून ......................................... शेतकरी गटाची स्थापना केली आहे. आमच्या शेतकरी गटाचे अध्यक्ष ................................... तसेच सचिव ................................... असून सदस्यांची संख्या ........... आहे. आमच्या गटाचे संघटन, संगोपन, प्रशिक्षण दिलासा जनविकास प्रतिष्ठान, औरंगाबाद ही संस्था सहकार्य करीत आहे.

त्यासाठी आवश्यक ठराव तसेच शेतकरी गटातील सदस्यांची यादी सोबत जोडली आहे. तरी आमच्या शेतकरी गटाचे खाते उघडण्यात यावे ही नम्र विनंती.

**अध्यक्ष** **सचिव**



**आत्मा आणि दिलासा जनविकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने**
**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत शेतकरीगटाची स्थापना**
**(प्रपत्र-१)**

DILASA

**शेतकरी गटाचे नाव -दिलासा-----------**

**ठराव क्र. १**

आज दि...........रोजी ता..............जि. औरंगाबाद............येथील शेतकरी गटाची सभा ...............वा संपन्न झाली. या सभेमध्ये शेतकरी गट स्थापन करावा असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**सूचक नाव................सही............अनुमोदक नाव..........सही............**

**विषय क्र. २ अध्यक्ष आणि सचिव निवडीबाबत**

**ठराव क्र. २**

अध्यक्ष व सचिवांच्या निवडीबाबत प्रस्ताव मांडला असता अध्यक्ष......................आणि सचिव..............................यांची नियुक्ती करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**सूचक नाव................सही............अनुमोदक नाव..........सही............**

**विषय क्र. ३ बँक खाते उघडणे**

**ठराव क्र. ३**

खाते उघडण्याबाबत प्रस्ताव मांडला असता ..............................गटाचे खाते ..............................येथे उघडण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**सूचक नाव................सही............अनुमोदक नाव..........सही............**

**विषय क्र. ४ अध्यक्ष व सचिवांना शेतकरी गटाचे आर्थिक व्यवहार पाहण्याचे अधिकार देण्याबाबत**

**ठराव क्र. ४**

शेतकरी गटाच्या आर्थिक व्यवहाराबाबत प्रस्ताव मांडला असता ..............................शेतकरी गटाच्या बँकेतील खात्याचे व्यवहार सचिव व अध्यक्ष यांच्या संयुक्त सहीने करावा. अध्यक्ष....................आणि सचिव ........................यांना संयुक्त सहीने अधिकार देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**सूचक नाव................सही............अनुमोदक नाव..........सही............**

## आत्मा आणि दिलासा जनविकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने
## महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत शेतकरी पीक व पशुसंवर्धन गटाची स्थापना
### (प्रपत्र-५)
### गोषवारा

| अ.क्र. | वर्गवारी | शेतकरी संख्या | वर्गवारी | शेतकरी संख्या | संवर्ग | शेतकरी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महिला | | अल्पभूधारक १ पेक्षा कमी | | अजा | |
| २ | पुरुष | | अल्पभूधारक १ ते २ हेक्टर | | अज | |
| ३ | ...... | | मोठे २ हेक्टरपेक्षा अधिक | | खुला | |

............................
दिलासा प्रतिनिधीचे नाव व सही

............................
शेतकऱ्याचे नाव व सही



# शेतकरी गटाचे मूल्यमापन आणि वर्गवारी

शेतकरी गटांचे संघटन करण्यासाठी नेमलेल्या संस्थेने (सेवापुरवठादार संस्था) तसेच संघ / कंपन्या स्थापन करण्यासाठी नेमलेल्या संस्थेने आणि आत्मा (संबंधित तालुक्याचे बीटीएम आणि एसएमएस) यांनी संयुक्तपणे गटांचे मूल्यमापन करावयाचे आहे. मूल्यमापनासाठी सोबत मूल्यांकन प्रपत्रे दिलेली आहेत. प्रपत्रात दिलेल्या महत्त्वाच्या मुद्यांकडे सुरुवातीपासून लक्ष दिल्यास गटाला मूल्यमापनाच्या वेळी अडचणी येणार नाहीत.

## मूल्यमापनातील महत्त्वाचे मुद्दे

**समूह गुणवत्ता मापन**

१) गटांतील समन्वय / ऐक्य / आत्मीयता / एकसंघता
२) गट स्थापनेची उद्दिष्टे नियमावली, जबाबदारी व बचत इत्यादीबाबत गटातील सदस्यांना माहिती
३) गटाची सभा
४) सभेसाठी सदस्यांची उपस्थिती
५) गटाचे रेकॉर्ड व्यवस्थापन
६) कृषीविषयक व्यवसाय व कार्यक्रमाची माहिती

**वित्तीय बाबींवर आधारित समूह गुणवत्ता**

१) गटाची बचत
२) गटांतर्गत कर्ज पद्धती
३) गटांतर्गत कर्जाची परतफेड
४) गटांतर्गत सदस्यांची गुणवत्ता
५) गटाचे लेखाअभिलेख
६) कृषी आधारित प्रक्रिया / उपक्रमांची वार्षिक उलाढाल
७) कृषी व संलग्न विभागाच्या उपक्रमात गटांचा सहभाग
८) गटांचे उत्पादक कंपनीमध्ये सदस्यत्व

वरील मुद्दे पाहिले असता असे लक्षात येईल की गटाचे ऐक्य, नियमित बैठका, रेकॉर्ड, विविध कार्यक्रमांचे आयोजन, नियमित बचत, कर्जाची देवाण-घेवाण आणि परतफेड, गटाचे हिशोब कृषी आधारित प्रक्रिया इत्यादी गोष्टींना महत्त्वाचे स्थान आहे. गटाची गुणवत्ता वाढविणे आणि टिकविणे हे त्यावरच अवलंबून आहे.

गटाच्या मूल्यमापनासाठी महत्त्वाचे मुद्दे आणि त्याला असणारे गुण याची सविस्तर माहिती असलेली प्रपत्रे सोबत जोडलेली आहेत.

## प्रपत्र
# शेतकरी गटांचे मूल्यांकन

### अ) शेतकरी गटांची प्राथमिक माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शेतकरी गटांचे नाव | | |
| | गाव - | मंडळ - | |
| | तालुका - | जिल्हा - | |
| २) | गट स्थापनेचा दिनांक | आत्मा / नाबार्ड / धर्मादाय आयुक्त / इतर | |
| ३) | गट नोंदणी | | |
| ४) | गट नोंदणी क्रमांक | | |
| ५) | सदस्य संख्या | पुरुष : | महिला : |
| ६) | गटाच्या सभेची वारंवारता | पंधरवडा / महिना | |
| ७) | गटातील शेतकऱ्यांची प्रमुख पिके | | |
| ८) | गट स्थापनेचा प्रमुख उद्देश | | |
| ९) | गटाचे प्रमुख पदाधिकारी | | |
| | अ) अध्यक्ष | | |
| | ब) सचिव | | |
| | क) खजिनदार | | |
| १०) | गटाचे बँक / खाते क्रमांक<br>बँकेचे नाव व शाखा | | |
| ११) | गटाची बचत प्रति सदस्य / प्रति महिना | | |
| १२) | गटाची बचत एकूण बचत रक्कम रुपये | | |
| १३) | उत्पादक कंपनीचे सदस्यत्व असल्यास<br>कंपनीचे नाव व नोंदणी क्रमांक | | |
| १४) | शेती आधारीत प्रक्रिया उद्योग असल्यास | | |
| | त्यांचा तपशील | | |
| १५) | गट कोणी स्थापन केला | | |



### ब) शेतकरी गट / समूह गुणवत्ता मापन

गटाचे नाव : ...................... गाव :.. .......... तालुका : ............ जिल्हा : ...........

| अ. क्र. | बाब | कमाल गुण | प्राप्त गुण / दर्जा |
|---|---|---|---|
| १ | गटांमधील समन्वय / ऐक्य / आत्मीयता / एकसंघता<br>(उत्कृष्ट-१०, चांगले-८, सर्वसाधारण-५, वाईट-००) | १० | |
| २ | गटातील सदस्यांना गट स्थापनेचे उद्दिष्ट, नियमावली, जबाबदारी व बचत इत्यादीबद्दल माहिती<br>(उत्कृष्ट-१०, चांगले-८, सर्वसाधारण-५, वाईट-००) | १० | |
| ३ | गटाची सभा<br>अ) सभा नियमित वेळी व तारखेला >९०% गुण-१०<br>ब) ७१ ते ९०% गुण-०८<br>क) ५० ते ७०% गुण-०५<br>ड) <५० गुण-०० | १० | |
| ४ | सभेसाठी सदस्यांची उपस्थिती<br>अ) सरासरी उपस्थिती ९०% गुण-१०<br>ब) सरासरी उपस्थिती ७१ ते ९०% गुण-१०<br>क) सरासरी उपस्थिती ५० ते ७०% गुण-०५<br>ड) सरासरी उपस्थिती < ५० गुण-०० | १० | |
| ५ | गटाचे रेकॉर्ड व्यवस्थापन<br>(उत्कृष्ट-१०, चांगले-८, सर्वसाधारण-५, वाईट-००)<br>अ) इतिवृत्त वही<br>ब) सर्वसाधारण नियमावली व कायदे इत्यादीबाबत ठराव<br>क) सभा उपस्थिती नोंदवही<br>ड) कृषी आधारित उपक्रमाची नोंदवही<br>ई) शेती कृषी निविष्ठा खरेदी नोंदवही<br>फ) कृषी उत्पादन व इतर नोंदवही | १० | |
| ६ | कृषी विषयक व्यवसाय कार्यक्रमाची माहिती<br>अ) ९०% पेक्षा जास्त सभासदांना माहिती गुण-०५<br>ब) ७१ ते ९०% सभासदांना माहिती गुण-०४<br>क) ५० ते ७०% सभासदांना माहिती गुण-०३<br>ड) ५०% पेक्षा कमी सभासदांना माहिती गुण-०० | ०५ | |

## क) शेतकरी गट / समूह गुणवत्ता (वित्तीय बाबींवर आधारीत)

| अ. क्र. | बाब | कमाल गुण | प्राप्त गुण / दर्जा |
|---|---|---|---|
| १ | गटाची बचत<br>अ) सर्व सदस्यांची नियमित बचत गुण-०५<br>ब) ९९% ते ९०% सदस्यांची नियमित बचत गुण-०४<br>क) ७० ते ९०% सदस्यांची नियमित बचत गुण-०३<br>ड) ७०% सदस्यांची नियमित बचत गुण-०० | ०५ | |
| २ | गटांतर्गत कर्ज पद्धती<br>अ) ९०% पेक्षा जास्त शेतकऱ्यांना कर्ज वाटप गुण-०५<br>ब) ७१ ते ९०% पेक्षा जास्त शेतकऱ्यांना कर्ज वाटप गुण-०४<br>क) ५० ते ७०% पेक्षा जास्त शेतकऱ्यांना कर्ज वाटप गुण-०३<br>ड) ५०% पेक्षा जास्त शेतकऱ्यांना कर्ज वाटप गुण-०० | ०५ | |
| ३ | गटांतर्गत कर्जाची परतफेड (मागील वर्षातील)<br>अ) १०० टक्के मुद्दल व व्याजसहीत परतफेड गुण-०५<br>ब) ७० ते ९०% मुद्दल व व्याजसहीत परतफेड गुण-०४<br>क) ५० ते ७०% मुद्दल व व्याजसहीत परतफेड गुण-०३<br>ड) कर्ज परतफेड नाही गुण-०० | ०५ | |
| ४ | गटांतर्गत सदस्यांची गुणवत्ता<br>अ) थकबाकीदार नाही गुण-०५<br>ब) १ ते २ थकबाकीदार गुण-०४<br>क) २ ते ४ थकबाकीदार गुण-०३<br>ड) ५ पेक्षा जास्त थकबाकीदार गुण-०० | ०५ | |
| ५ | गटाचे लेखा अभिलेख<br>(उत्कृष्ट-५, चांगले-४, सर्वसाधारण-३)<br>अ) बचतीचे नियमित नोंद होणारे लेजर वही अद्यावत गुण-०५<br>ब) कर्जाची नोंदवही गुण-०४<br>क) केशबुक अद्यावत गुण-०३ | ०५ | |



| अ. क्र. | बाब | कमाल गुण | प्राप्त गुण / दर्जा |
|---|---|---|---|
| ६ | कृषी आधारीत प्रक्रिया/उपक्रमाची वार्षिक उलाढाल<br>५ लाख पेक्षा जास्त गुण-१०<br>५ लाख ते १ लाख पेक्षा जास्त गुण-०७<br>१ लाख ते ५० हजार गुण-०५<br>५० हजार ते २५ हजार गुण-०३<br>शून्य उलाढाल गुण-०० | १० | |
| ७ | कृषी व संलग्न विभागाच्या उपक्रमात गटांचा सहभाग<br>अ) उपक्रमाचे नाव<br>ब) कालावधी<br>क) स्वरूप<br>ड) गटाचे साहाय्य | ०५ | |
| ८ | गटांचे उत्पादक कंपनीमध्ये सदस्यत्व | | |
| | कंपनीचे नाव | ०५ | |
| | स्थापन वर्ष | | |

## जनजागृती आणि प्रशिक्षण कार्यक्रम

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाअंतर्गत निवडलेल्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये गट निर्मितीचे फायदे समजावेत यासाठी ग्रामपंचायतींना भेटी देणे तेथील पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणे, ग्रामसभा आयोजित करणे, नोटीस प्रसिद्ध करणे, पोस्टर लावणे, गावात दवंडी देणे यासारखे विविध जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच शेतकऱ्यांच्या गृहभेटी, कोपरा सभा, याचाही समावेश आहे.

गटांच्या मजबुतीकरणासाठी गट स्थापन झाल्यापासून खालीलप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात-

१) प्रशिक्षण सत्र-१ - या प्रशिक्षणात गट बांधणी, त्याचा उद्देश पदाधिकाऱ्यांची कार्यपद्धती, गटासाठी आवश्यक कागदपत्रे, बँकेत खाते उघडणे, इत्यादींबाबतची माहिती दिली जाते.

२) प्रशिक्षण सत्र-२ - शेतकरी गटांचे संघटन हे पिकांवर आधारित असल्यामुळे त्या भागातील प्रमुख पिकांची लावणी ते काढणीबाबतचे तंत्रज्ञान तसेच गटासाठी उपयुक्त योजना इत्यादींची माहिती दिली जाते.

३) प्रशिक्षण सत्र-३ - हे प्रशिक्षण गटांना बाजाराशी जोडण्यासाठी असते. त्यामध्ये शेतकऱ्यांचे संघ/ कंपन्या स्थापन करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

गटाचे प्रशिक्षण पार पडल्यानंतर गटाने प्रशिक्षण घेणाऱ्या संस्थेला पोचपावती द्यावी, त्याचा नमुना पुस्तकात दिला आहे.

**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प, पुणे**

**प्रशिक्षण क्र. १**

संस्था-

## पोहोच पावती

**विषय- शेतकरी गटातील शेतकऱ्यांचे गट बळकटीकरण आणि प्रकल्पाविषयी माहितीचे प्रशिक्षण** पोहोच पावती करुन देतो की, आनचे मौजे ------------------------------------या गावी..................................या नावाने महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकारा प्रकल्प (एम. ए. सी.पी.) अंतर्गत गट स्थापन केला आहे. सदर गटातील शेतकऱ्यांसाठी अनुक्रमे गटबांधणी, सक्षमीकरण, प्रकल्पाविषयी, कृषी विभागातील विविध योजनांची माहिती आणि पिक उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण ------------------या तारखेला आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणादरम्यान मी गटप्रमुख या नात्याने ------------------------------------या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने खालीलप्रमाणे स्टेशनरी व माहिती पुस्तिका गटातोल प्रत्येक शेतकरी सदस्य यांना वितरीत करण्यात आले.

१. पेन - २० नग

२. पॅड - २० नग

३. कृषी तंत्रज्ञान पुस्तीका

४. माहितीपत्रके ( गट संघटन, प्रकल्प परिचय पुस्तीका इ. घडीपत्रीका)

वरीलप्रमाणे सर्व साहित्य शेतकरी गटातील सभासदांना पोहोच झाले.

| | | | |
|---|---|---|---|
| सही | | | |
| नाव | | | |
| पदनाम-गटप्रमख | समूह संघटक समन्वयक | जिल्हा कृषि समन्वयक | कृषी विभागातील अधिकारी |

---

**पोहोच पावती महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प, पुणे**

**प्रशिक्षण क्र. २**

संस्था-

**विषय- शेतकरी गटातील शेतकऱ्यांचे गंट बळकटीकरण आणि तांत्रिक प्रशिक्षण**

पोहोच पावती करुन देतो की, आमचे मौजे ------------------------------------या गावी..................................या नावाने महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (एम. ए. सी.पी.) अंतर्गत गट स्थापन केला आहे. सदर गटातील शेतकऱ्यांसाठी अनुक्रमे शेतमाल, विक्री व्यवस्थापन आणि शेतकरी सामूहिक सेवा केंद्र च्या माध्यमातून पर्यायी बाजार व्यवस्था, धान्य तारण योजना, ऑनलाइन स्पॉट मार्केटिंग, करारशेती इ. या विषयावर प्रशिक्षण ------------------या तारखेला आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणादरम्यान मी गटप्रमुख या नात्याने ------------------------------------या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने खालीलप्रमाणे स्टेशनरी व माहिती पुस्तिका गटातील प्रत्येक शेतकरी सदस्य यांना वितरीत करण्यात आले.

१. पेन - २० नग २. पॅड - २० नग

३. कृषी तंत्रज्ञान पुस्तीका ४. माहितीपत्रके (उत्पादन तंत्रज्ञानाचे पिक निहाय माहिती पुस्तीका, शेतमाल विक्री व्यवस्थापन विषयी आणि शेतकरी सामूहीक सेवा केंद्र इ. विषयी घडीपत्रके)

वरीलप्रमाणे सर्व साहित्य शेतकरी गटातील राभारादांना पोहोच झाले.

| | | | |
|---|---|---|---|
| सही | | . | |
| नाव | | | |
| पदनाम-गटप्रमख | समूह संघटक समन्वयक | जिल्हा कृषि रामन्वयक | कृषी विभागातील अधिकारी |





# ४ शेतकरी उत्पादक गटाचे कामकाज

शेतकरी गटाचे महत्व काय आहे हे यापूर्वीच आपण पाहिले आहे. गटाचे नियम काटेकोरपणे पाळल्यास गट मजबूत रहातो. शेतकरी गट स्थापन करणे सोपे आहे पण तो टिकवून ठेवणे तितकेच आवश्यक आहे. ती सर्व गटाची जबाबदारी आहे. त्यासाठी गटाचे कामकाज, अध्यक्ष, सचिव आणि सभासद यांची कामे नेमकी काय आहेत हे समजावून घेऊ.

गटाचे कामकाज सुरळीत असेल तरच शेतकऱ्यांचा गट कंपनी स्थापनेच्या टप्प्याकडे जाऊ शकतो. गट स्थापन करताना सर्व सभासदाच्या संमतीने गटाचे अध्यक्ष आणि सचिव निवडले जातात.

### शेतकरी गटाचे कार्य :

शेतकऱ्यामधे जागरुकता घडवून आणण्याच्या कामी गटाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. गटातील सदस्यांपर्यंत नवीन तंत्रज्ञान पोहचवणे. आपल्या सहकाऱ्यांची क्षमता बांधणी करणे. कर्जाबद्दल मार्गदर्शन करणे ही कामे महत्वाची आहेत. याशिवाय इतर अनेक कार्ये गटाने करणे आवश्यक आहे.





१) गावातील जास्तीत जास्त शेतकरी गटात सहभागी व्हावेत यासाठी प्रोत्साहन देणे.

२) प्रत्येक महिन्याच्या बैठकीला बचतीसह उपस्थित रहाणे.

३) गटाच्या निरनिराळया कार्यक्रमात सहभागी होणे.

४) गटाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणे.

५) शेतमालाला वाढीव भाव मिळण्यासाठी निरनिराळया प्रक्रिया करणे.

६) विविध उत्पादनाच्या विक्रीसाठी प्रयत्न करणे.

७) गटाला आर्थिक मदत मिळण्यासाठी वेगवेगळया बँका, संस्था यांच्याशी संपर्क ठेवणे.

८) उत्पादनांची खरेदी विक्री करणाऱ्या संस्था, कंपन्या यांची माहिती घेऊन त्यांच्याशी संबंध प्रस्थापित करणे.

## अध्यक्षाची कामे :

१) गटाची देखभाल करणे.

२) प्रत्येक महिन्याला गटाची बैठक घेणे.

३) गटामध्ये शेतकऱ्यांना उपयोगी असणाऱ्या विषयावर चर्चा घडवून आणणे.

४) गटाला शेतीविषयक, नवीन तंत्रज्ञानाबदद्ल माहिती देणे.

५) गटाच्या समस्या, आपआपसातील वादविवाद सोडविणे.

६) गटाची एकजूट राखणे .

७) गटामध्ये जमा होणारी रक्कम नियमित बँकेत भरणे.

८) गटासाठी शेतकरी मेळावे, प्रशिक्षण कार्यक्रम, अभ्यास सहली आयोजित करणे.

९) ग्रामपंचायत, सोसायटी, बँका, खते, बी-बियाणांच्या कंपन्या यांच्याशी संपर्क ठेवणे.



## सचिवाची कामे :

१) दर महिन्याला बैठक घेण्यासाठी अध्यक्षांना मदत करणे.

२) बैठकीचा वृत्तांत लिहिणे.

३) गटाचा हिशोब ठेवणे.

४) गटाचे ग्रेडेशन करुन घेणे.

५) गटाचे ऑडिट करुन घेणे.

६) गटाचे रेकॉर्ड लिहिणे.

७) गटाचा पत्रव्यवहार बघणे.

८) गटाला बचतीची, व्याजाची, जमा-खर्चाची माहिती देणे.

## सभासदांची कामे :

१) गटाचे काम व्यवस्थित चालविण्याची जबाबदारी फक्त अध्यक्ष, सचिवाची नाही. सभासदांनीसुध्दा त्यांना सहकार्य करणे आवश्यक आहे.

२) गटाच्या बैठकीला सर्वांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

३) महिन्याची बचत ठरलेल्या तारखेला नियमितपणे गटाच्या सचिवाकडे द्यावी.

४) गटाच्या सर्व कार्यक्रमांमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे.

५) बँकेचे व्यवहार कळण्यासाठी गटातील सदस्यांनी आळीपाळीने बँकेत जावे.





## ५ शेतकरी गटाचे रेकॉर्ड

स्थापन झालेल्या प्रत्येक शेतकरी गटाला कामकाजाचे रेकॉर्ड ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. गटाचे रेकॉर्ड हा गटाचा आरसा असतो. रेकॉर्ड पाहिल्यावर गट कोणत्या स्थितीत आहे हे लगेच कळते. तसेच बँकेतून उद्योगासाठी कर्ज काढायचे झाल्यास बँक गटाचे रेकॉर्डच आधी तपासते. त्यामुळे प्रत्येक शेतकरी गटाने खाली स्पष्ट केल्याप्रमाणे बचत गटाचे रेकॉर्ड ठेवावे.

बचत गटासाठी आवश्यक रेकॉर्ड : १) ठराव पुस्तिका, २) कार्यक्रम पुस्तिका, ३) जमा-खर्च पुस्तक, ४) भेट नोंदवही

### १) ठराव पुस्तिका :

प्रत्येक शेतकरी गटाची दर महिन्याला बैठक आयोजित केली जाते. या बैठकीत वेगवेगळया विषयांवर ठराव मांडले जातात. त्या ठरावांची नोंद ठराव पुस्तिकेत करायची आहे. तसेच बैठकीला कोण आणि किती सदस्य उपस्थित होते याची नोंद करून सभासदांच्या सह्याही घ्यायच्या आहेत.

### २) कार्यक्रम पुस्तिका :

गट स्थापन झाल्यापासून निरनिराळे कार्यक्रम गटामार्फत घेतले जातात. त्या कार्यक्रमाचा सविस्तर अहवाल कार्यक्रम पुस्तिकेत ठेवणे गरजेचे आहे. यामध्ये कार्यक्रम कोणत्या स्वरूपाचा होता, वक्ते कोण होते, कार्यक्रमास किती लोक उपस्थित होते, त्याचे फोटो, सह्या, कार्यक्रमाची उद्दिष्टे काय होती याची सविस्तर नोंद ठेवणे आवश्यक आहे. तसेच गटामार्फत अभ्यास दौऱ्यासारखे कार्यक्रम घेतले जातात. त्याचीही नोंद यात केली जावी.

### ३) जमा-खर्च पुस्तक :

यामध्ये गटाकडे किती रक्कम जमा आहे आणि त्यातून किती खर्च केला याचा तपशील लिहिणे आवश्यक असते. जमा-खर्च लिहिल्यामुळे गटाच्या कारभारामध्ये विश्वासार्हता राहते.

### ४) भेट नोंदवही :

शेतकरी गटाला स्थापनेपासून अधिकारी, तज्ज्ञ व्यक्ती, संस्थेचे कर्मचारी, संस्था प्रमुख, अशा अनेक व्यक्ती भेटी देत असतात. भेट नोंदवहीमध्ये या सर्व भेटींचा तपशील समाविष्ट केलेला असतो.





## ६ शेतकरी उत्पादक संघ / कंपनीची स्थापना

शेतकरी गट स्थापन केल्यानंतर पुढचा अत्यंत महत्वाचा टप्पा म्हणजे शेतकरी उत्पादक संघ / कंपनी स्थापन करणे. आपण पाहतो की, आपल्या आजुबाजूला अनेक शेतकऱ्यांचे संघ आहेत. उदा. आंबा उत्पादक संघ, द्राक्ष उत्पादक संघ, मोसंबी उत्पादक संघ, भाजीपाला उत्पादक संघ इ. हे सर्व संघ एकत्रितपणे आपण उत्पादित केलेल्या मालाची विक्री करतात. या प्रकल्पातही संघाची स्थापना आवश्यक आहे.

गावपातळीवर तयार झालेल्या १५-२० शेतकरी गटांनी एकत्र येऊन संघाची स्थापना करावी लागते. साधारणपणे २० गटांचा मिळून १ संघ तयार होतो. संघाचे मुख्य काम शेतमालाची विक्री करणे. विक्री म्हटले की आर्थिक व्यवहार आलाच म्हणून संघाची नोंदणी कंपनी कायद्यानुसार करावी लागते. म्हणजेच शेतकरी संघाला कायदेशीर स्वरुप प्राप्त होते. हा संघ म्हणजेच उत्पादक शेतकऱ्यांची कंपनी.

शेतकऱ्यांची कंपनी स्थापन झाल्यावर तिला अनेक प्रकारची कार्ये करावी लागतात. उदा.दररोजच्या खर्चाचा हिशोब तसेच नोंदी ठेवणे, कार्यकारी मंडळाची बैठक घेणे, खर्चाचा आढावा घेणे, पुढील कामाचे नियोजन करणे, शिवाय कंपनीचे अहवाल नोंदणी अधिकारी कार्यालय, आयकर कार्यालय यांच्याकडे सादर करावे लागतात. याशिवाय कंपनीचे दरवर्षी लेखापरीक्षण करून घ्यावे लागते.

एकीकडे अन्नधान्याचे भाव प्रचंड वाढत आहेत पण शेतकऱ्याच्या मालाला मात्र योग्य भाव मिळत नाही. शेतकऱ्यांची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. शेतकऱ्याची स्थिती सुधारण्यासाठी शासनाने मोठया प्रमाणात पीक कर्जे शेतकऱ्यांना दिली पण शेतकरी अडचणीतून बाहेर आला नाही. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांमध्ये तितकेसे यश का मिळाले नाही? याची कारणे शोधणे गरजेचे आहे. बरेचदा बाजारपेठेत नेण्याइतका भरपूर माल शेतकऱ्याकडे असतोच असे नाही. असला तरी त्याचा दर्जा बाजारपेठेच्या तुलनेत चांगला असेलच असे नाही. तसेच मालाची विक्री करण्यासाठी बाजारपेठेत आवश्यक सोयीसुविधा

मिळत नाहीत. मुख्य म्हणजे शेतीमालाला किफायतशीर भावही मिळत नाही. एकंदरीत कष्ट करुनही शेतकऱ्याचे उत्पन्न वाढत नाही. उत्पन्न वाढल्यास शेतकऱ्याची परिस्थिती सुधारु शकते, यासाठी उत्पादक शेतकऱ्यांची कंपनी स्थापन करणे हा रामबाण उपाय म्हणावा लागेल.

उत्पादक कंपनी या संकल्पनेची ओळख पहिल्यांदा २००२ मध्ये झाली. थोर अर्थतज्ञ वाय. के. अलग यांच्या शिफारशीवरुन कंपनी कायद्यामध्ये उत्पादककंपनीचा समावेश करण्यात आला तेव्हापासून दरवर्षी उत्पादक कंपन्या कायदेशीरपणे स्थापन करण्यात येऊ लागल्या.

शेतकऱ्यांची कंपनी म्हणजे शेतकऱ्याला मालक बनविण्याचे, निर्णयाचे अधिकार त्याच्या हातात ठेवण्याचे, तसेच त्याचे बळकटीकरण करण्याचे महत्वाचे साधन आहे. अर्थातच यामध्ये सहभागी झालेले कंपनीचे सभासद स्वतः उत्पादक असले पाहिजेत. कंपनी कायद्यात उत्पादन ही कल्पना खूप व्यापक अर्थाने मांडली आहे. उत्पादनात पशुपालन, फलोत्पादन, द्राक्ष उत्पादन, पुष्प उत्पादन, मत्स्योत्पादन, यांचाही समावेश होतो. तसेच वनउत्पादने, मधुमक्षिका पालन, वृक्षलागवड, याशिवाय हातमाग, हस्तकला तसेच इतर लघुउद्योग यांचा समावेश होतो. कंपनीची उद्दिष्टे अनेक असतात तथापि ढोबळमानाने ती उद्दिष्टे खालीलप्रमाणे

१. एखाद्या मालाचे उत्पादन करणे. त्याची काढणी, प्रतवारी करणे, तसेच खरेदीविक्री करणे, उत्पादनाची आयातनिर्यात करणे सदस्यांच्या फायद्यासाठी विविध सेवा पुरविणे इत्यादी.
२. सभासदांनी उत्पादित केलेल्या मालावर प्रक्रिया करणे उदा. टिकविणे, सुकविणे, अर्क काढणे, खारवणे, पॅकींग करणे इ.
३. एखाद्या यंत्राची निर्मिती करणे, सभासदांना त्याचा पुरवठा करणे किंवा विक्री करणे.

इतर उद्दिष्टांमध्ये तांत्रिक मार्गदर्शन, सल्ला, इन्शुरन्स, ऊर्जानिर्मिती आणि तिचे वितरण, कल्याणकारी कार्यक्रम इ. समावेश होतो.

### उत्पादक शेतकऱ्यांच्या कंपनीचे फायदे

१. उत्पादन, लावणी, काढणी, प्रतवारी, प्रक्रिया, खरेदी, विक्री या प्रत्येक टप्प्यावर एकजुटीमुळे शेतकऱ्याचा फायदाच होतो.
२. उत्पादनाची विक्री करताना शेतकरी आणि ग्राहक या दोघांच्यामध्ये असणारी दलालांची साखळी कंपनीमुळे दूर ठेवता येते
३. मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांनी एकत्रितपणे एखाद्या गोष्टीचे उत्पादन घेतल्यास देशभरातल्या नामांकित कंपन्या, मोठे व्यापारी, शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष माल खरेदी करतील.
४. खते, बियाणे, कीटकनाशके यांची एकत्रित खरेदी केल्याने खर्चाची बचत होईल.



५. शेतमालाला ज्या ठिकाणी जास्त भाव आहे तिथे तो विकण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्याला कंपनीमुळे राहील.
६. ज्या गावात शेतकऱ्यांची उत्पादक कंपनी स्थापन होते ते गाव व्यापारी केंद्र बनते.

### शेतकरी सामुहिक सेवा केंद्र -
### Farmers' Common Service Center (FCSC)

आपण यापूर्वी पाहिले की, उत्पादक शेतकऱ्यांचे बचतगट स्थापन झाल्यानंतर उत्पादक शेतकऱ्यांची कंपनी तयार केली जाणार आहे. उत्पादक कंपन्याना नंतर सामुहिक सेवा केंद्राची उभारणी करायची आहे. **एका विशिष्ट उद्देशापोटी ३-५ किलोमीटर अंतरामधील १५-२० उत्पादक शेतकरी गट किंवा ३००-३५० शेतकऱ्यांनी मिळून एका विशिष्ट ध्येयाने स्थापन केलेले, उत्पादक कंपनीने निर्माण केलेले सुविधा केंद्र म्हणजे शेतकरी सामुहिक सेवा केंद्र.** या सेवा केंद्राच्या व्दारे शेतमाल एकत्र करुन त्यावर प्रक्रिया करण्यासाठी, त्याचे पॅकींग करण्यासाठी, त्याच्या साठवणुकीसाठी सुविधा निर्माण केल्या जातील. हे केंद्र सातत्याने चालावे, तसेच ते स्वतंत्र व स्वंयपूर्ण व्हावे यासाठी अनुदानही उपलब्ध करुन दिले जाणार आहे. एकंदरीत या सेवाकेंद्राव्दारे छोटया शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळेल आणि त्यांचे सबलीकरण होईल अशी योजना आहे.

### उद्देश :

१) दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शेतमाल तयार होण्यासाठी प्रयत्न करणे.
२) शेतकऱ्याच्या मालाला किफायतशीर भाव मिळवून देणे.
३) उत्पादक कंपनीच्या माध्यमातून शेतकरी गटांचा शेतमाल एकत्र करुन विक्री करणे.
४) उत्कृष्ट शेतमाल घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे.





## ७ नेहमी विचारले जाणारे प्रश्न

**प्रश्न १ शेतकऱ्यांना गटांचा काय फायदा होणार ?**

**उत्तर :** आज शेतकरी वर्ग गावातल्या वाडया, वस्त्या, तांडे याठिकाणी विखुरलेला आहे. गट स्थापन केल्यामुळे शेतकरी संघटित होईल. खते, बी-बियाणे, कीटकनाशके इ.बाबत आपआपसात चर्चा झाल्यामुळे नवीन माहिती मिळते शिवाय एकत्रितपणे या गोष्टींची खरेदी केल्यामुळे अनेक अडचणी दूर होतात. खर्चाची बचत होते. वाहतुकीचा खर्चही कमी होतो. गटाची बचत बँकेत नियमितपणे जमा होते. त्यामुळे शेतकऱ्याच्या कंपनीसाठी आवश्यक भागभांडवल उभे करण्यास मदत होईल.

**प्रश्न २ गावात जुने शेतकरी गट आहेतच ? मग नवीन गट व जुना गट यात फरक काय ?**

**उत्तर :** नवीन गटांची बांधणी पिकावर आधारित आहे. म्हणजे शेतकरी जे पीक घेतो त्या पिकानुसारच गटाची बांधणी केली जाणार आहे. आणि या शेतकरी गटांची नंतर कंपनी तयार होणार आहे . जुन्या शेतकरी गटांची कंपनी स्थापन केली जात नव्हती.

**प्रश्न ३ शेतकरी उत्पादक कंपनीचा काय फायदा होईल ?**

उत्तर : कंपनी तयार झाल्यावर शेतकऱ्यांचा थेट ग्राहकांशी संपर्क होईल.दलालांमुळे शेतकऱ्यांची जी लूट होते ती थांबेल. बाजारपेठेत थेट विक्री केल्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होईल. मुख्य म्हणजे एखादा माल किती विकायचा ? कुठे विकायचा? किंमत किती ठेवायची हे सर्व निर्णय शेतकरीच घेतील. एकंदरीत शेतकऱ्यांची उत्पादक कंपनी म्हणजे शेतकऱ्यांसाठी कामधेनूच आहे.

**प्रश्न ४ शेतकऱ्यांच्या कंपन्या कशाकशाच्या स्थापन होणार ?**

उत्तर : कंपन्याचे अनेक प्रकार असतात. साधारणपणे आपल्या गावात जी पिके, भाजीपाला, फळे शेतकरी उत्पादित करतात त्यानुसार कंपन्या स्थापन केल्या जातात. उदा. ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन या मालाची चाळणी, प्रतवारी करुन किंवा त्यावर प्रक्रिया करुन विक्री करणाऱ्या कंपन्या. किंवा भाजीपाला उत्पादकांची कंपनी. फलोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांची कंपनी इ.याशिवाय दुग्ध उत्पादनावर आधारित कंपन्याही तयार करता येतात.



**प्रश्न ५ दर महिन्याला बचत करणे आवश्यक आहे का ?**

उत्तर : हो. महिन्याला केल्या जाणाऱ्या बचतीचे अनेक फायदे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे बचतीची रक्कम बँकेत बाजूला पडते, ती बचत सुरक्षित रहाते आणि त्यावर व्याज मिळते.मुख्य म्हणजे शेतकरी गटांची जी कंपनी होणार आहे त्या कंपनीसाठी शेतकऱ्यांचा आर्थिक वाटा आवश्यक आहे. तो वाटा जमा केल्यासच कंपनीला अनुदान मिळणार आहे म्हणूनच दर महिन्याला न चुकता बचत बँकेत भरलीच पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे कंपनी साठीचा वाटा शेतकऱ्यांना एकदम जमा करणे शक्य नाही तो बचतीतून जमा केल्यास शेतकऱ्यांना ओझे वाटणार नाही.

**प्रश्न ५ उत्पादक शेतकऱ्यांच्या कंपन्यामुळे फायदा झाला आहे अशी उदाहरणे आहेत का ?**

**उत्तर :** यापूर्वीही शेतकऱ्यांच्या अनेक कंपन्या स्थापन झालेल्या आहेत. शेतकऱ्यांनी या कंपनीच्या माध्यमातून आपली प्रचंड प्रगती केली आहे. उदा. मध्यप्रदेश या राज्यामध्ये शेतकरी उत्पादक कंपन्याचे जाळेच तयार झाले आहे. उदा.छत्तरपूर येथे बियाणे धान्य आणि मिरची याचा व्यापार करणारी खजुराहो क्रॉप कंपनी आहे. तर टिकमगड येथे महिला मुर्गी उत्पादक कंपनी आहे. सागर या ठिकाणी सागर श्री महिला दुग्ध उत्पादक कंपनी आहे. शाजापूर याठिकाणी बियाणे धान्य आणि जैविक खते इत्यादी बाबतची समर्थ किसान प्रोड्यूसर कंपनी आहे. या कंपन्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नात ३० ते ४० टक्के वाढ झाली आहे. कंपन्याची उलाढाल प्रचंड आहेच आणि हे शेतकरी रिलायन्स फ्रेश, आय.टी.सी. या देशातल्या मोठया कंपन्याशी व्यापार करत आहेत.

**प्रश्न ६ या प्रकल्पाबद्दलची अधिक माहिती कुठे मिळेल?**

**उत्तर :** दिलासा जनविकास प्रतिष्ठान, औरंगाबाद तसेच आत्मा, (एमएसीपी), पुणे





# ८ शेतकरी उत्पादक संघासाठी उपयुक्त अर्थसाहाय्य योजना

## (Equity Grant Scheme)

पिकावर आधारित शेतकऱ्यांचे गट संघटित केल्यानंतरचा महत्वाचा टप्पा म्हणजे शेतकरी उत्पादक संघ. संघाची कंपनी कायद्यानुसार नोंदणी झाल्यावर त्यास आर्थिक स्थैर्य असणे गरजेचे असते. या शेतकरी कंपनीच्या विकासासाठी विविध योजना खालीलप्रमाणे

### १) समभाग निधी योजना (Equity Grant Scheme)

'छोटया शेतकऱ्यांचा कृषी व्यापार संघामार्फत' समभाग निधी योजना राबविली जाते. ही योजना जानेवारी २०१४ पासून सुरु झाली आहे. शेतकऱ्यांच्या कंपनीला आर्थिक स्थैर्य लाभावे हा मुख्य हेतू त्याचबरोबर शेतकरी उत्पादक कंपनीची क्षमता वाढविणे, शेतकऱ्यांचा कंपनीत सक्रिय सहभाग वाढविणे, मालकी वाढविणे, समभाग वाढविणे ही देखील महत्वाची उद्धिष्टे आहेत.

वरील योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक बाबी -

०१) शेतकऱ्यांची कंपनी १९५६ च्या कंपनी कायद्यानुसार नोंद झालेली पाहिजे.
०२) कंपनीचे भाग भांडवल सर्व शेतकऱ्यांनी मिळून उभे केलेले असावे.
०३) भागधारकांची संख्या ५० पेक्षा कमी नको.





०४) भागधारकांचे भाग भांडवल ३० लाखांपेक्षा जास्त नको.
०५) अल्प, मध्यम आणि भूमिहीन शेतकऱ्यांचा कंपनीत ३३% समभाग असावा.
०६) सभासदांचे भागभांडवल कंपनीच्या एकूण भांडवलाच्या ५% पेक्षा कमी नको.
०७) संचालक मंडळातील सदस्यांचे भागभांडवल कंपनीच्या एकूण भांडवलाच्या ७०% पेक्षा जास्त नसावे.
०८) शेतकऱ्यांच्या कंपनीस कायदेशीर व्यवस्थापकीय संचालक मंडळ आवश्यक.
०९) संचालक मंडळात कमीतकमी ५ सदस्य आणि त्यात १ महिला सभासद असणे अनिवार्य.



१०) कंपनीने पुढील १८ महिन्यांचा उत्पन्न, प्रगती, नियोजन आणि अंमलबजावणी विषयीचा आराखडा सादर करणे अपरिहार्य.
११) बँकेत कंपनीचे शेतकरी उत्पादक खाते असावे.
१२) कंपनीचे किमान एक वर्षाचे लेखापरीक्षण सनदी लेखापालाकडून केलेले असावे.

ज्या उत्पादक शेतकरी कंपन्यांचे भांडवल ३० लाखापर्यंत आहे अशा कंपन्यांना समभाग भांडवला बाबत प्राधान्य दिले जाते.

**समभाग भांडवल कसे दिले जाते ?**

१) उत्पादक शेतकरी कंपनीसाठी समभाग निधीची कमाल रक्कम १० लाख रु.
२) हे समभाग भांडवल कंपनीच्या बँक खात्यावर जमा केले जाते.

३) समभाग भांडवल मिळाल्यावर कंपनीने ४५ दिवसात भाग भांडवलधारकांस अतिरिक्त समभाग भांडवल प्राप्त झाल्याची पावती देणे अनिवार्य.

४) समभाग भांडवल कंपनीस २ हप्त्यात काढता येईल. (पहिला अर्ज केल्यापासून २ वर्षाच्या आत)

**समभाग भांडवलासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी**

१) सनदी लेखापालांकडून प्रमाणित केलेली समभाग भांडवल धारकांची यादी आणि त्यांचे समभाग.

२) उत्पादक शेतकरी कंपनीची घटना.

३) मागील तीन वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल. तीन वर्ष झाली नसल्यास १ वर्षाचे लेखापरीक्षण.

४) बँक मॅनेजरने प्रमाणित केलेले कंपनीच्या मागील ६ महिन्यांचे बँक खात्याचे व्यवहार.

५) पुढील १८ महिन्यांचे आर्थिक नियोजन.

अर्जाच्या प्रत्यके पानावर कंपनीतील २ संचालक किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधींची सहा संचालक मंडळांचे किंवा त्यांनी अधिकृत केलेल्या व्यक्तीचे नांव व छायाचित्र.

**निधी वितरण** - वरील सर्व अटींची पूर्तता केल्यावर कंपनी आणि छोटया शेतकऱ्यांचा कृषी व्यापार संघ यांच्यात करारनामा होऊन समभाग भांडवल बँक खात्यावर जमा होईल.





## २) पतहमी निधी योजना (Credit Gurantee Scheme)

शेतकरी उत्पादक कंपनीस विनातारण कर्ज पुरवठा करण्यासाठी पतहमी निधी योजना राबविण्यात येते. 'छोटया शेतकऱ्यांचा कृषी व्यापार संघाने' २०१४ पासून ही योजना सुरु केली आहे.

**पतपुरवठा करणाऱ्या संस्था**

खालील संस्था मार्फत पतपुरवठा करण्यात येतो.
शेडयुल बँक, प्रादेशिक ग्रामीण बँक, राष्ट्रीय व्यावसायिक सहाकार विकास महामंडळ, उत्तरपूर्व आर्थिक विकास महामंडळ, नाबार्ड व त्याच्या संलग्न संस्था.

**पतपुरवठयाची मर्यादा**

या योजनेत पतपुरवठयाची कमाल मर्यादा १.०० कोटीपर्यंत आहे.

**योजनेचे निकष**

१) या योजनेचा लाभ घेण्यासाठी पतपुरवठा करणाऱ्या संस्थेकडून कर्ज मंजूर झाल्यावर शेतकरी उत्पादक कंपनीने ६ महिन्यांच्या आत लेखी अर्ज करणे आवश्यक असते.

२) या योजनेत मुदतकर्ज / खेळते भांडवल / संमिश्र कर्ज घेताना कसल्याही प्रकारचे तारण दुय्यम हमी त्रयस्थ संस्था किंवा व्यक्ती किंवा संचालक मंडळाची व्यक्तिगत हमी आवश्यक नाही.

३) शेतकरी उत्पादक कंपनीला पतपुरवठादार संस्थेने ५ वर्षाच्या काळात २ वेळा पतपुरवठा केल्यास त्या सर्व पतपुरवठयावर कृषी व्यापार संघामार्फत हमी दिली जाते.

## ३) समभाग भागभांडवल योजना / बिनव्याजी कर्ज योजना (Venture Capital Assistance Scheme)

'छोटया शेतकऱ्यांचा कृषी व्यापार संघामार्फत' समभाग भागभांडवल योजना राबविली जाते. ज्या उत्कृष्ट गुणवत्तेच्या कृषी प्रक्रिया उद्योगाला राष्ट्रीकृत बँकानी कर्ज मंजूर केले आहे त्यांना या योजनेचा लाभ मिळू शकतो.

भारतीय स्टेट बँकेच्या साहाय्यक बँका, विभागीय ग्रामीण बँका ,राज्य आर्थिक महामंडळ, नाबार्ड, एमसीडीसी, एनईडीएफई या वित्तीय संस्थांव्दारे कर्ज मंजूर झालेल्या प्रकल्पास या योजनेचा लाभ दिला जातो.

**योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे**

१) शेतकरी, उत्पादक शेतकरी गट, कृषी पदवीधर यांना कृषी उद्योग प्रकल्प उभारणीस साहाय्य करणे.

२) कृषी उद्योगात खाजगी गुतवणुकीस प्रोत्साहन देऊन ग्रामीण भागातील उत्पादन तसेच रोजगार वाढविणे.

३) कृषी उद्योगाव्दारे कच्च्या मालाचे उत्पादन करणे आणि त्यावर प्रक्रिया करणे ही साखळी मजबूत करणे.

४) कृषी उद्योग उभारणीसाठी राष्ट्रीकृत बँकेच्या साहाय्याने चालना देणे.

५) कृषी प्रक्रिया उद्योगासाठी पध्दतशीर उभारधी करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.



**कोणत्या प्रकल्पांना मदत मिळते ?**

कृषी प्रक्रियाउद्योग फलोत्पादन, पुष्पोत्पादन, औषधी, सुगंधी वनस्पती, मसाला पिके, रेशीम उद्योग, सेंद्रिय शेती प्रकल्प, गांडूळ खत उत्पादन प्रकल्प, मधुमक्षिकापालन, दुय्यम वन उत्पादन, मत्स्य व्यवसाय, कुक्कुट पालन (मांस प्रक्रिया), दुग्ध प्रक्रिया उद्योग, सदर प्रकल्प बँक कर्जाशी निगडित असणे आवश्यक आहे.



**अर्थसाहाय्य**

कृषी प्रक्रियाउद्योगासाठी बँकेने कर्ज मंजूर केलेल्या १५ लाख किंवा त्यापेक्षा जास्त गुंतवणुकीवर अर्थसाहाय्य मिळते. वैयक्तिक लाभार्थ्याला स्वगुंवतणुकीच्या २६ इ, तर शेतकरी उत्पादक कंपनीस ४० इ किंवा ५० लाखापर्यंत यापैकी जे कमी असेल किंवा अर्थ साहाय्य समभाग भांडवल म्हणून दिले जात. हे बिनव्याजी कर्ज असते.

**लाभार्थी कोण असतील ?**

वैयक्तिक लाभार्थी, शेतकरी गट, उत्पादक गट, खाजगी संस्था, भागीदारी संस्था, स्वयंसाहाय्यता गट, कंपनी, कृषी निर्यात करणारे कृषी उद्योजक, कृषी पदवीधर, इत्यादी अर्थसाहाय्यासाठी पात्र असतील.

**प्रकल्प विकास सुविधा**

कृषी उद्योगासाठी छोटया शेतकऱ्यांचा कृषी व्यापार संघाने मान्यता दिलेल्या संस्थेकडून किंवा कंपनीकडून प्रकल्प प्रस्ताव तयार करुन घेणे बंधनकारक आहे. प्रकल्प प्रस्तावासाठी कंपनीला / संस्थेला १ लाखाचे अर्थसाहाय्य देण्यात येईल.





## ९ यश कथा : उत्पादक शेतकरी कंपन्यांच्या

### इंडियन ऑरगॅनिक फार्मर्स कंपनी- केरळ

केरळ मधील आलुवा येथील शेतकऱ्यांनी इंडियन ऑरगॅनिक फार्मर्स कंपनीची स्थापना करुन सेंद्रिय माल उत्पादित करण्यास सुरुवात केली . जगात विस्तारत जाणारी सेंद्रिय मालाची बाजारपेठ डोळयासमोर ठेऊन आलुवाच्या शेतकऱ्यांनी घेतलेला हा निर्णय त्यांना प्रगतिपथावर घेऊन गेला.



केरळ मधील शेतकऱ्यांची ही पहिली उत्पादक कंपनी आहे. शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादित केलेला ४० टक्के सेंद्रिय माल या कंपनीकडून विक्री करता येतो. कंपनी शेतकऱ्यांना माती, पाणी परीक्षण आदी सुविधा पुरवते. निरोगी नागरिक, श्रीमंत शेतकरी आणि निरोगी व श्रीमंत देश हे या कंपनीचे ब्रीद आहे. भविष्यात पर्यावरणासाठी देण्यात येणारा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय निधी उत्पादक कंपनीला कसा मिळवता येईल असे या कंपनीचे उद्दिष्ट आहे.



### मध्यप्रदेशात रुजल्या १७ कंपन्या

मध्यप्रदेश सरकार आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सध्या मध्यप्रदेशात शेतकरी गट चळवळ मोठ्या प्रमाणात उभी राहिली आहे. या चळवळीचे फलित म्हणजे येथे शेतकऱ्यांच्या १७ मोठ्या कंपन्या उभ्या राहिल्या असून त्या कोट्यवधींचे व्यवहार करत आहेत. धान्य आणि बियाणे उत्पादक शेतकऱ्यांच्या या कंपन्या आहेत. ४४, ८०० शेतकऱ्यांचे मोठे संघटन उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून मध्यप्रदेशात तयार झाले आहे. कष्टाने पिकवलेल्या शेतमालाला योग्य भाव मिळत असल्याने या कंपन्यातील शेतकरी संपन्न बनला आहे. जागतिक बँकेच्या अर्थसाह्यातून हा प्रकल्प मध्यप्रदेशात राबवण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात ६६ टक्के वाढ दिसून आली.

### गुजरातमधील अमरेलीत सहकार्यातून विकास

गुजरात मधील अमरेली जिल्ह्यातील धारी या गावातील शेतकऱ्यांनी उत्पादक कंपनी स्थापन केली. गावात पाणलोटाचे काम सुरु होते. त्यानिमित्ताने एकत्र आलेल्या शेतकऱ्यांनी कंपनीची स्थापना करुन शेतीसाठी लागणारे सर्व साहित्य एकत्रित खरेदी करण्यास सुरवात केली. सुरुवातीला गटातील शेतकऱ्यांपुरता मर्यादित असलेला हा व्यवहार हळू हळू गावाशी होऊ लागला. कंपनी गटाबाहेरील इतर शेतकऱ्यांना बी बियाणे, खते, कीटकनाशक विकून नफा मिळवू लागली. उत्पादित मालाची निर्यात करण्याच्या दृष्टीने या कंपनीने वाटचाल सुरु केली असून त्यासाठी मालाचे ग्रेडींग, पॅकेजींग याची तयारी सुरु केली आहे. कंपनीत सहभागी शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे सातत्य टिकून रहावे यासाठी कृषी विषयक तंत्रज्ञानाची माहिती कंपनी शेतकऱ्यांना वेळोवेळी मिळवून देत असते.

### अमूलची भरारी

अमूल आईस्क्रिम, दूध, दही, श्रीखंड घरोघरी पोहचले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहलेले हे नाव सुरवातीला शेतकऱ्यांच्या छोट्या संघटनातूनच उभे राहिले आहे. गुजरात मधील आणंद या गावच्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन दूध संकलनाचे काम सुरु केले. त्यातून त्यांची डेअरी उभी राहिली. पुढे ही डेअरी गुजरात कोऑपरेटीव्ह मिल्क मार्केटींग फेडरेशन मध्ये रुपांतरित झाली. याच



कंपनीला अमूल या नावाने ओळखले जाते. गावपातळीवर दुग्धउत्पादक शेतकरी एकत्रित येऊन केवढे मोठे काम उभे करु शकतात हे अमूलच्या उदाहरणावरुन सांगता येईल.

## वर्ध्यातील तूर उत्पादक सुखी झाला



विदर्भ म्हणताच शेतकऱ्यांच्या आत्महत्या डोळ्यासमोर येतात. या परिस्थितीवर वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून एकत्रित येऊन मात केली आहे. वर्ध्यात तुरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असले तरी शेतकऱ्यांना योग्य भाव कधीच मिळत नसे. कष्टाने पिकवलेल्या मालाला भाव मिळत नसल्याने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना टाटा केमिकल्सच्या रुपाने पर्याय मिळाला. या मोठ्या कंपनीने तुरीची एकत्रित खरेदी करण्याची तयारी दर्शवली. बाजारात तुरीला तीन हजार क्विंटलच्या वर भाव मिळत नसे. टाटा केमिकल्सने ३ हजार ६०० रुपये क्विंटलने खरेदीची तयारी दर्शवली. शेतकरी या निमित्ताने एकत्रित झाले. त्यांनी वर्धा उत्पादक कंपनीची स्थापना केली. कंपनीच्या माध्यमातून टाटा केमिकल्सला तूर विकण्याचा निर्णय झाला. वर्धा उत्पादक कंपनीच्या माध्यमातून अनेक शेतकरी एकत्र आले आहेत. बाजारभावाच्या तुलनेत त्यांना किमान सहाशे ते आठशे रुपये जास्त मिळतात. वर्धा कंपनीला मिळालेले यश पाहून विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यातील शेतकरीही एकत्र येत आहेत.

## भिवधानोऱ्याचा कल्पतरु ब्रँड

औरंगाबाद जिल्ह्याच्या गंगापूर तालुक्यातील भिवधानोरा गावच्या शेतकऱ्यांनी महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पामध्ये सहभाग नोंदवला. गावात कल्पतरु कृषी विज्ञान केंद्र नावाने शेतकरी गटांची स्थापना करण्यात आली. या गटांनी उत्पादक कंपनी स्थापन केली. ही कंपनी मागील तीन वर्षापासून कल्पतरु या ब्रँड नेमने औरंगाबाद शहरातील अनेक वसाहतींना दर्जेदार



गव्हाची विक्री करत आहे. एवढेच नाही तर २०१२ च्या खरीप हंगामात सोयाबीनसाठी सामुहिक कार्यक्रम राबवण्यात आला. पहिल्याच प्रयत्नात सोयाबीनच्या उत्पादनात भरघोस वाढ दिसून आली.

लासूर स्टेशन कृषी उत्पन्नबाजार समितीअंतर्गत भिवधानोरा हे गाव येते. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाअंतर्गत गावात मोठ्या प्रमाणात शेतकरी गट बांधणी झाली. याचे उत्पादक कंपनीत रुपांतर करण्यात आले. कंपनीचा वाटा आणि शासनाचे अनुदान याच्या माध्यमातून गावात ५०० क्विंटल क्षमतेचे गोदाम उभे राहिले. गव्हाचे ग्रेडींग करण्यासाठी मशीन घेण्यात आली. आत्मा तर्फे भरवल्या जाणाऱ्या धान्य महोत्सवात कंपनीने गहू विक्रीसाठी आणला. गव्हाचे ग्रेडींग आणि पॅकेजिंग केलेले असल्याने त्याची हातोहात विक्री झाली. एवढेच नाही तर कंपनीला पुढील वर्षासाठी नवी ऑर्डरही मिळाली. 'स्वस्त हवे की स्वच्छ हवे' या घोषवाक्याने भिवधानोऱ्याच्या उत्पादक कंपनीने कल्पतरु ब्रँडखाली गव्हाची विक्री सुरु केली आहे.



या योजनेअंतर्गत गावात ३६ एकरावर सोयाबीन पीक प्रात्यक्षिक घेण्यात आले. सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करुन सोयाबीनची उत्पादकता आणि शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी ३६ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली. कृषी अधिकाऱ्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन आणि बीज प्रक्रिया, योग्य खत व पाणी व्यवस्थापन, एकात्मक कीड व्यवस्थापन यामुळे सोयाबीनच्या उत्पादनात वाढझाली. बहुतांश शेतकऱ्यांनी एकरी १० क्विंटलपर्यंत उत्पादन काढले आहे.

उत्पादक शेतकरी कंपन्यांच्या अशा अनेक यशकथा सर्वच शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आहेत. चला तर आपणही कृषी विकासाची गुरूकिल्ली असलेल्या शेतकरी गटांमध्ये सामील होऊ या.